# नागपूर जिल्हा (ग्रामीण) पोलीस वार्तापत्र
# पोलीस अधिक्षक कार्यालय, नागपूर.

दिनांक 31/10/2023 (मंगळवार) दुपार

---

## जिवानीशी ठार करणाऱ्या आरोपीला कोर्टातुन शिक्षा

पो.स्टे. कळमेश्वर :— दिनांक २५/०१/२०१८ चे २२/२७ वा. दरम्यान यातील फिर्यादी नामे— पुंडलीक नागोजी लांबसे वय ५४ वर्ष, रा. मोहपा यांच्या रिपोर्ट वरुन पो.स्टे. कळमेश्वर येथे अप. क्र. ६५/२०१८ कलम ३०२ भादवि भादवि. कायद्यान्वये गुन्हा नोंद झालेला होता.

यातील **आरोपी नामे— निलेश अर्जुनराव बडवाईक वय २४ वर्ष, रा. मोहपा** व मृतक नामे— रामलाल उर्फ प्यारेलाल सोमलाल आहाके, वय ३२ वर्ष, रा. छिंदवाडा ह. मु. मोहपा हे एकमेकांना ओळखत असुन दि. ०३/१०/२०१६ रोजी रात्री दरम्यान मृतक याने मेंढया चारण्याचे कारणावरुन आरोपीला डोक्यावर, हातावर मारुन जखमी केल होते. तेव्हा पासुन मृतक हा मोहपा व बुधला परीसरातुन निंघुन गेला होता. घटनेच्या एक महीन्यापुर्वी मृतक हा गावात परत आला. त्याचे विरुध्द आरोपीचे मनात चिड व राग असल्याने मृतक हा किशोर ढोबळे यांचे पानठेल्याजवळ शेकोटीवर हात शेकत असतांना मिळुन आल्याने आरोपीने मृतकाला निर्दयतेने काठीने व विटेने डोक्यावर, कपाळावर, ठिकठिकाणी गालावर व हनुवटीवर मारुन जिवानीशी ठार केले.

सदर प्रकरणाचे तपास पोलीस निरीक्षक श्री. चंद्रशेखर बहादुरे यांनी करून सदर प्रकरण न्याय प्रविष्ठाकरीता मा. श्री. पावसकर सा. जिल्हा न्यायाधीश कोर्ट क्र. ०५ यांचे न्यायालयात सादर केले. आज दिनांक ३१/१०/२०२३ रोजी मा. श्री. पावसकर सा. जिल्हा न्यायाधीश कोर्ट क्र. ०५ यांनी वरील नमुद आरोपीस कलम ३०२ भादवि मध्ये आजिवन कारावास व १०,०००/— रु. दंड, दंड न भरल्यास ०३ वर्ष सश्रम कारावास अशी शिक्षा ठोठावली आहे.

सरकारचे वतीने एपीपी पंकज तपासे सा़े. यांनी काम पाहीले. कोर्ट कामात पैरवी अंमलदार म्हणुन सफौ/८९ प्रमोद कडबे पो.स्टे. कळमेश्वर यांनी मदत केली आहे.

## जिवानाशी ठार करणाऱ्या आरोपीला अटक

पो.स्टे. कन्हान :— अंतर्गत ८ किमी अंतरावर मौजा टेकाडी कन्हान ता. पारशिवनी येथे दिनांक ३१/१०/२०२३ चे ०९/०५ वा. ते १०/१५ वा. दरम्यान फिर्यादी नामे— रामकृष्ण शालीकराम देवगडे वय ५६ वर्ष रा सुपारे लेआउट, रनाळा ता. कामठी यांची मृतक मुलगी नामे —डुलेश्वरी रामकष देवगडे वय २८ वर्ष हिचे लग्न आरोपी नामे— अमित नारायण भोयर वय २९ वर्ष रा. महाजन नगर टेकाडी कन्हान तह. पारशिवनी सोबत दिनांक ०५.०३.२०२३ रोजी झालेले असुन यातील आरोपीने फिर्यादीस ''उसे नई गाडी लेना है'' असे म्हणुन फिर्यादीने फक्त ३०,०००/—रु आरोपीस दिले, अधिक पैसे मागण्याचे कारणावरुन फिर्यादीच्या मुलीसोबत झगडा भांडण करुन फिर्यादीचे मुलीचे गळयावर चाकुने वार करुन मुलीचा खुन केला.

सदर प्रकरणी फिर्यादी यांचे रिपोर्ट वरुन पो.स्टे. कन्हान येथे आरोपीविरुध्द कलम ३०२, ४९८ ए भादवी अन्वये गुन्हा नोंद केला आहे. गुन्हयाचा पुढील तपास सहायक पोलीस निरीक्षक राजेश जोशी पो.स्टे. कन्हान मो. नं. ७८७५९६६६७६ हे करीत आहे.

## मौदा पोलीसांची रेती चोरीवर दोन वेगवेगळया कारवाई

१) दिनांक २९/१०/२०२३ रोजी पोलीस ठाणे मोदा येथे असलेले डी. बी. पथकाचे प्रमुख सहायक पोलीस निरीक्षक सतीष सोनेकर यांना गुप्त बातमीदारांकडुन खबर मिळाली की, ट्रॅक्टर क्रमांक MH–३६/N– २९२६ चा चालक मालक नामे विनोद रघुनाथ लेंडे रा. दहेगांव राजे जिल्हा भंडारा हा आपले ट्रॅक्टर क्रमांक MH–३६–N–२९२६ ला विना नंबरची ट्रॉली लाउन त्यात चोरीची रेती भरुन चिचोली गावाकडे जात आहे. मिळालेल्या खबरे वरून ठाणेदार श्री पराग पोटे यांचे मार्गदर्शनात डी. बी. पथक मधिल पोलीस हवालदार गणेश मुदमाळी पोलीस अंमलदार शिवाजी दिंडे यांचे सह पेट्रोलिंग मध्ये गेले असता धानला गाव ते चिचोली चे मध्ये ट्रॅक्टर क्रमांक MH–३६/N– २९२६ चा चालक मालक नामे विनोद रघुनाथ लेंडे रा. दहेगांव राजे जिल्हा भंडारा हा आपले ट्रॅक्टर ला विनानंबरची ट्राली लाउन त्यात चोरीची ०१ ब्रास रेती कींमती ४,०००/– रुपयाची भरुन वाहतूक करतांना मिळुन आला त्यास रॉयल्टी विचारली असता नसल्याचे सांगितल्याने नमुद ट्रॅक्टर रेती भरलेले ट्रॉली सह पोलीस ठाणे येथे आणुन ०१ ब्रास रेती कीमती ४,०००/– रुपये तसेच ट्रॅक्टर ट्रॉली सह कींमती ६ लाख रुपयाचा माल जप्त करुन सहायक पोलीस निरीक्षक सतीष सोनेकर यांनी दिलेल्या तक्रारी वरुन पोलीस ठाणे मौदा येथे कलम ३७९ भादवि सहकलम ४८ (८) महसुल अधिनीयम अन्वये गुन्हा दाखल करण्यात आलेला असून पुढील तपास वरिष्ठ पोलीस निरीक्षक पराग पोटे यांचे मार्गदर्शनात पोलीस हवालदार गणेश मुदमाळी पोलीस ठाणे मौदा करीत आहे

२) दिनांक दिनांक ३०/१०/२०२३ रोजी पोलीस ठाणे मौदा येथे नेमणुकीस असलेले पोलीस उपनिरीक्षक सचिन उरकुडे हे रात्री पेट्रोलिंग मध्ये असतांना गुप्त बातमीदारांकडुन खबर मिळाली की. ट्रक क्रमांक MH–३२–AJ–६०३२ चा चालक सुधिर रामचंद्र तेलतुमडे रा. मास्टर कॉलनी वर्धा तसेच सोबत ट्रक चा वाहक नामे निकेश सुखदेव नेताम रा. कार्ला वर्धा हे दोघे ट्रक चे मालक जुबेर खान रा. वर्धा यांचे सांगण्यावरुन आपले ट्रक मध्ये चोरीची रेती वाहुन नेत आहे. मिळालेल्या खबरे वरुन ठाणेदार श्री पराग पोटे यांचे मार्गदर्शनात पोलीस उपनिरीक्षक सचिन उरकुडे हे सोबत असलेले पोलीस हवालदार प्रकाश गाठे यांचे सह रबडीवाला वाय पॉईन्ट येथे सरकारी वाहनासह नाकाबंदी करून ट्रक क्रमांक MH–३२–AJ–६०३२ चालक हा बोरगाव कडुन नागपुर कडे जात असता त्यास थांबउन ट्रक चालक तसेच वाहकास रेती बाबत रॉयल्टी विचारली असता नसल्याचे सांगितल्याने नमुद ट्रक हा रेतीसह पोलीस ठाणे येथे आणुन ०९ ब्रास रेती कींमती ३६,०००/– रुपये तसेच ट्रैक कीमती ४५ लाख रुपयाचा मुद्देमाल जप्त केला पोलीस हवालदार प्रकाश गाठे पोलीस ठाणे मौदा यांनी दिलेल्या तक्रारी वरुन पोलीस ठाणे मौदा येथे ट्रक चालक, वाहक तसेच ट्रक मालकाचे विरोधात कलम ३७९, १०९ भादवि सहकलम ४८ (८) महसुल अधिनीयम अन्वये गुन्हा दाखल करण्यात आलेला असून पुढील तपास वरिष्ठ पोलीस निरीक्षक पराग पोटे यांचे मार्गदर्शनात पोउपनि सचिन उरकुडे पोलीस ठाणे मौदा करीत आहे.

पोलीस माहिती कक्ष
नागपूर जिल्हा (ग्रामीण), नागपूर